**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५२/२०२५ मध्ये निशाण १७ वरील आदेश.</u>**

अर्जाचे बारकाईने अवलोकन केले. वादीचे प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादीने सदरचा दावा इंडियन इजमेंट ॲक्टचे कलम १३ प्रमाणे दि. २२/१२/२०२५ रोजी दाखल केला. न्यायालयाचे आदेशान्वये प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स व कारणे दाखवा नोटीस पाठविणेत आली. त्यानुसार प्रतिवादी क्र. २ व ५ यांना समन्स व नोटीसची बजावणी करणेत आली. प्रतिवादी क्र. २ तर्फे न्यायालयास प्रतिवादी क्र. १, ३ व ४ हे मयत असल्याचे कळविणेत आले. तसेच निशाण १५ येथे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचेपूरता दावा डिसमिस करण्याबाबत अर्ज देण्यात आला. सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५१ प्रमाणे देण्यात आला आहे, परंतु, तसा अर्ज कोणत्याही पक्षकारास देता येत नाही. वादीने प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी पासूनच प्रतिवादी क्र. १ ते ५ हे आळीपाळीने वादी यांना हरकत करीत हाते. त्यामुळे वादी यांनी केवळ मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिडींग टाळण्याकरिता म्हणून एकाच दाव्यातील सर्व प्रतिवादींना पक्षकार म्हणून सामील केले. परंतु, प्रतिवादी क्र. १, ३ व ४ हे मयत असल्याचे प्रतिवादी क्र. २ ने दाखल केलेल्या मृत्यू दाखल्यावरून दिसत असल्याने सदर प्रतिवादींविरूध्द हा दावा पुढे चालविणेचा नाही. तसेच वादीचे माहितीप्रमाणे हे प्रतिवादी अविवाहीत होते. त्यामुळे वादीने सदर अर्ज दाखल करीत प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांना डिलीट करण्याची व प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे विरूध्द दावा पुढे चालविणेची विनंती केलेली आहे.

०२. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. २ तर्फे म्हणणे निशाण २५ येथे दाखल केलेले आहे. त्यांचे कथनानुसार वादीचा सदरचा अर्ज हा खोडसाळ आहे व दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५१ हे न्यायालयास अंगभूत अधिकार (inherent powers) प्रदान करते. कलम १५२ बाबत वादीने नमूद केलेला मजकूर हा पूर्णपणे चुकीचा आहे. त्यांनी अर्जातील वादीची कथने नाकारली. त्यांचे कथनानुसार वादीने प्रतिवादी क्र. १ व ४ हयात नाहीत ही बाब जाणीवपूर्वक लपविलेली आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

०३. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले. युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी

क्र. २ यांनी निशाण १३/१ येथे प्रतिवादी क्र. १ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत, निशाण १३/२ येथे प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत व निशाण १३/३ येथे प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदर दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ हे दि. १४/१२/२०२३, प्रतिवादी क्र. ३ हे दि. २८/०७/२०२४ व प्रतिवादी क्र. ४ ह्या दि. १५/०९/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. २ याने निशाण १५ येथे अर्ज दाखल करीत प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचे वर नमूद तारखेस निधन झाले असल्याचे कथन केले आहे.

**०४.** वरील सर्व चर्चेचा विचार करता व वादीची प्रस्तुत अर्जातील मागणी विचारात घेता त्याला प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचे विरूध्द चालविण्याचे नसल्याचे दिसून येते. तरी वादीस दावा कोणा विरूध्द चालवायचा या बाबीचा विचार करता वादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्ज, निशाण १३ येथील मृत्यू दाखले या सर्वांचे अवलोकन केल्यानंतर मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

## <u>आदेश</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** नियमित दिवाणी दावा क्र. ५२/२०२५ यामधून प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचे नाव कमी करण्यात यावे.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.10 17:44:11 +0530

**दिनांक :१०/०४/२०२६** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण–लांजा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**लांजा,जि.रत्नागिरी**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 10/04/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 10/04/2026 |
| Order uploaded on | :- | 10/04/2026 |